सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७

# जमीन महसुलाच्या माफीबाबत (क्रमांक २) अधिनियम, १८६३

(दिनांक २३ जून, २००६ पर्यंत सुधारित)

**Bombay Act No. VII of 1863**

# The Exemptions from Land-Revenue (No. 2) Act, 1863

*(As modified upto 23rd June 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित

२००७

[किंमत रु. ७-००]

# जमीन महसुलाच्या माफीबाबत (क्रमांक २) अधिनियम, १८६३

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | [निरसित केले] .. .. | ५ |
| २. | कित्येक जिल्ह्यातील जमिनी, कबूल केलेल्या अटींवर आणि शर्तीवर धारकांकडे कायम चालणाऱ्या आहेत असे अधिकृत करून तशी हमी देण्याचा अधिकार | ५ |
| | अपवाद .. .. | ६ |
| | अपवादात्मक जमिनी पुढे कोणत्या सत्ताप्रकाराने चालतील. .. | ६ |
| ३. | हा अधिनियम लागू नसणाऱ्या जमिनी. .. .. | ६ |
| ४. | [निरसित] .. .. | ६ |
| ५. | [निरसित] .. .. | ६ |
| ६. | कलम २, खंड १ अन्वये वंशपरंपरा चालणाऱ्यागत आणि हस्तांतरणयोग्य जमिनी, राज्य सरकारला ठराविक वार्षिक रक्कम देण्यास पात्र असणे. .. | ७ |
| | आकारणीची रक्कम निश्चित करण्याविषयी नियम. | ७ |
| ७. | कलम ६ अन्वये वार्षिक उक्ता धारा बसविण्याबाबत केलेली तडजोड, हक्कदार मालकावर आणि तसेच भूमि धारकावर बंधकारक असणे. .. .. | ८ |
| | हक्कदार मालक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांचे, धारक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांच्या विरुध्दच्या हक्कांचे आणि उपाययोजनांचे संरक्षण. | ८ |
| ८. | मालकी हक्क सिध्द झाला असता धारकास उक्ता धाऱ्याची माफी मिळून त्याच्या मालकी हक्कासंबंधी आणखी चौकशी होऊ नये. .. .. | ८ |
| ९. | अशी तडजोड करून घेण्यास तुम्ही तयार आहात का आपल्या मालकी हक्काबाबत चौकशीची मागणी करता हे कळविण्याबद्दल धारकांस नोटीस देण्याचा कलेक्टरास अधिकार असणे. .. .. | ९ |
| | नोटिशीची भाषा व नमुना. .. .. | ९ |
| | नोटीस कोणावर बजावण्यास येईल. .. .. | ९ |
| | धारक जिल्ह्याच्या हद्दीत राहत नसेल तेव्हा. .. .. | ९ |
| | अनेक इसम संयुक्तपणे जमीन धारण करीत असतील तेव्हा नोटीस ज्या रीतीने बजाविण्यात येईल ती रीत. .. .. | ९ |
| | धारक दुसऱ्या जिल्ह्यात राहतो असे माहीत असेल तेव्हा नोटीस ज्या रीतीने बजाविण्यात येईल ती रीत. .. .. | ९ |
| | धारकाच्या वतीने व्यवस्था पाहणारा कोणी नसेल आणि धारक सापडत नसेल तर, नोटीस बजाविण्याची रीत. .. .. | १० |

अनुक्रमणिका--चालू

उद्देशिका

कलमे पृष्ठ


धारक नोटीशीचे उत्तर सहा महिनेपर्यंत न देईल तर त्यास अशा चौकशीची आवश्यकता नाही असे समजणे. .. .. १०

धारक किंवा मालक यांचा पत्ता न लागल्यास जमिनीवर पूर्ण आकारणी बसवावी. १०

नोटीस पुरेशा मुदतीत बजाविण्यात आली नाही किंवा तिचे उत्तर पुरेसे नाही म्हणून घेतलेल्या हरकतीची चौकशी. .. .. १०

१०. मागणी केलेली चौकशी कशी करावी. .. .. १०

मालकी हक्क जितक्या जमिनीबद्दल सिध्द झाला असेल त्यापेक्षा अधिक धारण केलेल्या जमिनीवर पूर्ण आकारणी बसवावी. .. .. ११

माफी सिध्द न झाल्यामुळे होणारा परिणाम. .. .. ११

११. न्यायचौकशीची आणि निवाड्याची मागणी करणाऱ्या धारकांनी तारणपत्र पुरविणे. ११

धारकाने त्याचा मालकीहक्क सिध्द केल्यास आकारणीची रक्कम आणि अनामत रकमा व्याजासह त्यांस परत मिळणे. .. .. ११

मालकीहक्क सिध्द न झाला तर धारकाने जमीन महसुलाची पूर्ण रक्कम द्यावी.

१२. चौकशी कोणी करावी. .. .. १२

१३. चौकशीची मागणी करणाऱ्या दावेदाराने करावयाच्या गोष्टी. .. १२

खंड १ नुसार आवश्यक असलेल्या गोष्टींचे पालन करण्यात कसूर केल्यास दावा नामंजूर करणे. .. .. १२

कलेक्टरने चौकशीचे कागदपत्र स्वतः दाखल करावे किंवा इतर अधिकाऱ्यांकडे पाठवावे, चौकशीची तारीख निश्चित करावी. .. .. १२

ज्या तारखेस न्यायचौकशी करण्यात येईल त्या तारखेची नोटीस दावेदारास देणे. १२

१४. चौकशीची मागणी करणाऱ्या दावेदारावर मालकीहक्क सिध्द करण्याचा बोजा. १३

१५. सरकारी अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असलेल्या सरकारी दफ्तरातील पुरावा घेण्याचा दावेदारास अधिकार असणे. .. .. १३

१६. विवक्षित सनदा पुराव्यांत दाखल करण्यात न्यायचौकशी अधिकाऱ्यावर बंधन नसणे. १३

१७. साक्षीदारांवर समन्स बजाविणे, त्यांनी हजर राहणे आणि त्यांची तपासणी करणे याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता लागू असणे. .. .. १३

कलेक्टरची कचेरी दिवाणी न्यायालय समजणे. .. .. १४

१८. कामकाजाच्या दफ्तराची भाषा. .. .. १४

निर्णयाचे भाषांतर दावेदारास देणे. १४

न्यायालय शुल्क अधिनियम लागू असणे. १४

अनुक्रमणिका--समाप्त

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| | माफी चालू राहण्याबद्दल झालेला निर्णय अखेरचा असणे. प्रतिकूल निर्णय झाल्यास दावेदाराने अपील करणे. | १४ |
| | अपील यशस्वी झाल्यास रक्कम परत मिळणे. | १४ |
| | दावेदार, प्रारंभिक न्यायचौकशीत सादर न केलेला नवीन पुरावा अपिलात सादर करील तर त्याची अनामत सरकार जमा होईल. .. .. | १४ |
| | न्यायालय शुल्क अधिनियम लागू असणे. .. .. | १५ |
| | कलेक्टरचा निर्णय रद्द करण्यास प्रतिबंध. .. .. | १५ |
| | सनदे अन्वये माफीविषयी दावा केला असेल तेव्हा, सनदेतील अटीनुसार माफी मंजूर करावी. .. .. | १५ |
| | सनदा देण्याच्या किंवा त्या रद्द करण्याच्या अधिकाराची ज्यांना मान्यता दिली आहे ते अधिकारी. .. .. | १५ |
| | पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्याच्या मालकीहक्काच्या आधारे केलेला माफीसंबंधीचा दावा मान्य करणे. .. .. | १५ |
| २२. | पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्याच्या आधारावर मान्य केलेला मालकीहक्क कोणत्या शर्तीनुसार मान्य करण्याचे चालू राहील. .. .. | १६ |
| २३. | पूर्वापार भोगवट्यावर आधारित असलेला मालकीहक्क केव्हा मान्य करू नये. | १६ |
| २४. | हल्लीचे किंवा पूर्वीचे सरकार वगैरेंनी काढलेल्या आदेशा अन्वये माफी रद्द झाली तर, पूर्वापार भोगवट्याचा सनद, वगैरे अन्वये मिळालेला मालकीहक्क, पुरेसा मालकी हक्क नसणे. .. .. | १६ |
| | लेखा अन्वये किंवा मान्यता असलेल्या सत्ताप्रकारा अन्वये भोगवटा झाला म्हणून मालकी हक्क केव्हा पुरेसा नसणे. .. .. | १६ |
| | आकारणी ठरवून तिचा जितका भाग वसूल केला असेल तेवढ्याच भागाच्या मालकीहक्कास हरकत घेणे. .. .. | १७ |
| २५. | दत्तक केव्हा मंजूर करू नये. .. .. | १७ |
| २६. | कलमे २० ते २५ लागू असणे. .. .. | १७ |
| २७. | [निरसित केले] .. .. | १७ |
| २८. | तडजोड करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामकाजावर अपील करणे. .. | १७ |
| २९. | [निरसित केले] .. .. | १७ |
| ३०. | उक्ता धारा कसा बसवावा. .. .. | १७ |
| ३१. | जमिनी मोजण्यासाठी किंवा त्यावर आकारणी बसविण्याकरिता प्रवेश करणे. | १८ |
| ३२. | अर्थ विवरणात्मक खंड. .. .. | १८ |
| | अनुसूची .. .. | १८ |

# सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७१

## [जमीन महसुलाच्या माफीबाबत (क्रमांक २) अधिनियम १८६३.][१]

[२ जुलै, १८६३]

हा अधिनियम पुढील आधिनियमां अन्वये अंशतः निरसित करण्यात आला :--

सन १८७३ चा अधिनियम १२.

सन १८७६ चा अधिनियम १०.

सन १८७६ चा अधिनियम १२.

हा अधिनियम सन १८७९ चा मुंबई अधिनियम ५ या अन्वये अंशतः निरसित (स्थानिक बाबतीत) करण्यात आला.

हा अधिनियम सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३ अन्वये अंशतः निरसित करण्यात आला व सुधारण्यात आला.

या अधिनियमात सन १८९५ चा अधिनियम १६ अन्वये सुधारणा करण्यात आल्या.

या अधिनियमांत, भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश आणि विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये अनुकूलन व रुपभेद करण्यात आले.

**भारतीय परिषदेचा सन १८५२ चा अधिनियम ११ मुंबई इलाख्याच्या ज्या भागास लागू नाहीं त्या भागात जमीन महसुलाची माफी आहे असा दावा करणाऱ्या इसमांच्या दाव्यांची संक्षिप्तरीत्या तडजोड करून आणि अशी माफी पुढे ज्या शर्तीवर मान्य करण्यात येईल त्या शर्तीचे नियमन करण्याबाबत अधिनियम.**

ज्या अर्थी, सन १८५२ चा अधिनियम ११ हा ज्या जिल्ह्यात अंमलात नाही त्या जिल्ह्यातील काही जमिनींचे अपवाद खेरीजकरून, जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफीने धारण केलेल्या जमिनीबाबत, त्या तशा धारण केलेल्या आहेत असे सांगणाऱ्या दाव्यांची संक्षिप्तरीत्या तडजोड करून, आणि पुढे तत्संबंधी सरकारचे आणि धारकाचे अधिकार यासंबंधी कोणताही संशय राहू नये म्हणून, अशा जमिनीची माफी ज्या अटींनुसार मान्य करण्यात येईल त्या अटींचे नियमन करणे, आणि अपवाद केलेल्या जमिनीबाबत तरतूद करणे, इष्ट आहे ; उद्देशिका.

त्या अर्थी, या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

**१.** [रद्द केले] हे कलम सन १८७३ चा अधिनियम १२ या अन्वये रद्द करण्यात आले.

**२.** खंड १ ला.-- जेव्हा (ह्या कलमातील खंड २ मधील अपवाद खेरीजकरून), उक्त कोणत्याही जिल्ह्यातील जमीनधारक सरकारी जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी असलेल्या जमिनी धारण करतील त्यांनी अशा माफीसंबंधीचा आपला दावा सिध्द केला पाहिजे. परंतु तसे न करता ते जर पुढे सांगितलेल्या शर्तीप्रमाणे व अटींप्रमाणे वागण्यात संमती देतील तर, उक्त धारकांकडे, त्यांच्या वारसांकडे आणि अभिहस्तांकितीकडे उक्त जमिनी, उक्त शर्तीप्रमाणे व अटींप्रमाणे कायम चालणाऱ्या आहेत असे [२][[३][राज्य] सरकारने] अंतिमरीत्या ठरविणे आणि सनदे अन्वये हमी देणे हे विधिसंमत असेल.

कित्येक जिल्ह्यातील जमिनी, कबूल केलेल्या अटींवर आणि शर्तीवर धारकांकडे कायम चालणाऱ्या आहेत असे अधिकृत करून तशी हमी देण्याचा अधिकार.

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता मुंबई शासनाचे राजपत्र पुरवणी, पृ. ६३५ (इंग्रजी) पहा निवड समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राचे पृ. ७४२ (इंग्रजी) पहा, आणि परिषदेमधील कार्यवाहीसाठी वरील राजपत्राचे पृ. ७१५ आणि वरील राजपत्राचे १८६३ पृ. २०९ आणि २३४ पहावे.

संक्षिप्त नाव मुंबई लघुसंज्ञा अधिनियम, १९२१ (१९२१ चा मुंबई २) अन्वये देण्यात आले.

सन १८६३ चा मुंबई ७ लागू असल्याप्रमाणे, पहा मुंबई भूमि महसूल संहिता १८७९ (१८७९ चा मुंबई ५) पृ. १२७.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अपवाद. खंड २ रा.--या तरतुदींन्वये दाव्यांची तडजोड करून हमी देण्याचे [१][२][राज्य] सरकारकडे] निहित असलेले अधिकार हे ज्या अपवाद ठरविलेल्या जमिनीस लागू असणार नाहीत त्या जमिनीचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत :--

१ ला--तहनाम्या अन्वये धारण केलेल्या जमिनी ;

२ रा--संरजाम किंवा तशाच राजकीय सत्ताप्रकाराने दिलेल्या किंवा धारण केलेल्या जमिनी ;

३ रा--सेवेबद्दल धारण केलेल्या जमिनी ;

४ था--ज्या जमिनी वंशपरंपरागत जमिनी नाहीत असा त्याबाबत पूर्वीच यथानियम निवाडा दिला असेल त्या जमिनी.

अपवादात्मक जमिनी पुढे कोणत्या सत्ताप्रकाराने चालतील.

खंड ३ रा.--१ ला--तहनाम्या अन्वये धारण केलेल्या जमिनी अशा तहाच्या अटीनुसार धारण करता येतील.

२ रा.--संरजाम किंवा तशाच इतर राजकीय सत्ताप्रकाराने धारण केलेल्या जमिनी, राजनैतिक मोबदला म्हणून [१][२][राज्य] सरकार] वेळोवेळी जी पध्दत ठरवील आणि अटी [३][ठरवील] अशा पध्दतीप्रमाणे आणि अशा अटीप्रमाणे चालू राहतील किंवा त्या सरकार परत आपल्या ताब्यात घेईल.

३ रा.--सेवेबद्दल धारण केलेल्या जमिनी, [१][२][राज्य] सरकार], वेळोवेळी घालून देईल आणि त्यास योग्य वाटतील अशा सामान्य नियमा अन्वये चालू राहतील किंवा सरकार त्या आपल्या ताब्यात घेईल.

४ था.--वंशपरंपरागत चालणाऱ्या नाहीत असा पूर्वीच यथानियम निवाडा ज्या जमिनीबाबत दिला गेला असेल अशा जमिनी, प्रत्येक प्रकरणी जो निर्णय देण्यात आला त्या निर्णयानुसार धारण करता येतील.

खंड ४ था.--[हे कलम सन १८७६ चा अधिनियम १० या अन्वये रद्द करण्यात आले.]

हा अधिनियम लागू नसणाऱ्या जमिनी.

**३.** तालुकदारी, भागदारी, नखादारी, खोती किंवा इतर अशाच सत्ताप्रकाराने धारण केलेल्या गावांतील ज्या जमिनी उक्त गावांतील हल्लीच्या किंवा पूर्वीच्या धारकांनी किंवा त्यांच्यापैकी कोणीही एकाने संपूर्णतः किंवा अंशतः दुमाला करून दिलेल्या आहेत त्या जमिनीस हा अधिनियम लागू असणार नाही ; आणि अशा सर्व गावांची व्यवस्था [१][२][राज्य] सरकार] कोणत्याही वेळी आपल्या ताब्यात घेईल तेव्हा, दुमाला असलेल्या अशा सर्व जमिनी, [२][राज्य सरकारच्या] मालकीच्या होतील आणि त्या जमिनीच्या सार्वजनिक महसुलाबाबत धारकांनी किंवा त्यांच्यापैकी कोणीही केलेली कोणतीही व्यवस्था त्या जमिनीस लागू होणार नाही. परंतु जमीन सरकारकडे गेल्यामुळे जनतेच्या हक्कास इतर कोणत्याही रीतीने बाध येणार नाही.

**४** आणि **५.** [उपकर कमी करणे वगैरे, आणि नैमित्तिक आकारणी.] हे कलम सन १८७५ चा मुंबई अधिनियम ५ या अन्वये (स्थानिक बाबतीत) रद्द करण्यात आले.

कलम २, खंड १ अन्वये वंशपरंपरा चालणाऱ्यागत आणि हस्तांतरण.

**६.** वार्षिक जमीन महसुलाची सामान्य रक्कम भरण्याबाबत माफी मिळालेल्या जमिनी, त्यांच्या धारकांकडे, त्यांच्या वारसाकडे आणि अभिहस्तांकितीकडे कायम चालणाऱ्या आहेत असे अधिकृत करून त्याबद्दल [१][२][राज्य] सरकार] कलम २, खंड १ अन्वये हमी देईल तेव्हा, उक्त जमिनी (कलम ७ [४][****]मधील मजकुरास अधीन राहून), उक्त धारकांची, त्यांच्या वारसांची आणि अभिहस्तांकितींचा वंशपरंपरागत चालणारी आणि हस्तांतरण योग्य मालमत्ता होईल आणि ती अशी असण्यास दत्तक घेण्यामुळे, आनुषंगिक उत्तराधिकारामुळे किंवा हस्तांतरणामुळे

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] या संबंधात सन १८५२ चा अधिनियम क्रमांक ११, अनुसूची ब चा नियम (१०) (भाडे माफी मालमत्तेचे हक्क) पहावा.

[४] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याची अनुसूची म्हणून छापण्यात आली आहे.

प्रतिबंध होणार नाही; आणि अशा जमिनी आकारणीच्या प्रत्येक रुपयास दोन आणे या दराने [१][२][राज्य] सरकारला ठराविक वार्षिक रक्कम देण्यास] पात्र असतील. अशी आकारणी पुढील नियमा अन्वये निश्चित करण्यात येईल :--

योग्य जमिनी, [२][राज्य] सरकारला ठराविक वार्षिक रक्कम देण्यात पात्र असणे.

**नियम १.**--नियम २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनी खेरीजकरून सध्या अंमलात असलेल्या महसूल मोजणी अन्वये पूर्वीच आकारणी केलेल्या जमिनीसंबंधाची महसूल आकारणी ही त्या महसूल मोजणी अन्वये त्यावर पूर्वीच बसविलेल्या आकाराइतकी असेल, आणि, ज्या जमिनींवर त्या महसूल मोजणी अन्वये अद्याप आकारणी केलेली नाही अशा जमिनीबाबतची आकारणी ही, कलेक्टर किंवा तडजोड अधिकारी आणि त्या जमिनीचा मालक किंवा धारक यांनी कबूल केल्याप्रमाणे असेल. आणि अशी आकारणी अखेरची समजावी ; परंतु अशी कबुलायत न झाल्यास, सध्या अंमलात असलेल्या महसूल मोजणी अन्वये यावर नवीन आकारणी करण्यात येईपर्यंत, उक्त आकारणी अशा जमिनीबाबत जो खंड देण्यात येतो त्या खंडा इतकीच असली पाहिजे. नंतर उक्त महसूल मोजणी अन्वये बसविलेली आकारणी हीच आकारणी समजावी आणि उक्त महसूल मोजणीकरिता नेमलेल्या व ज्यांना योग्यरीत्या अधिकार दिले असतील अशा [२][शासनाच्या] अधिकाऱ्यांनी, अशा महसूल मोजणी अन्वये यापूर्वीच आकारणी न बसविलेल्या जमिनीवर अशी आकारणी करण्यासाठी आणि तो निश्चित करण्यासाठी प्रवेश करणे हे विधिसंमत असेल.

आकारणीची रक्कम निश्चित करण्याविषयी नियम.

**नियम २.**--ज्या जमिनी अशा काही विशेष प्रकारच्या असतील की ज्यांच्यावर महसूल पाहणी नियमा अन्वये आकारणी बसविता येणार नाही त्या जमिनींची आकारणी [१][२][शासनाच्या]] महसूल अधिकाऱ्यांनी स्वविवेकानुसार केली पाहिजे आणि अशी स्वविवेकानुसार केलेली आकारणी, त्याच जिल्ह्यांतील [१][२][शासनाच्या मालकीच्या]] तशाच प्रकारच्या जमिनी ज्या दराने खंडाने दिल्या असतील त्या दराशी शक्य तेथवर सुसंगत असली पाहिजे. आणि उक्त महसूल अधिकाऱ्यांनी अशा जमिनींच्या बाबतीतील सर्व न्याय्य गोष्टींची योग्य दखल घेतली पाहिजे.

या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता गावांच्या महसुलांच्या हिश्यांची (अंमल वगैरे धरून) करावयाची आकारणी, हे नियम प्रसिध्द होण्याच्या निकटपूर्वीच्या दहा वर्षात अशा हिश्याच्या धारकांस जी प्राप्ती झाल्याचा हिशोबी दाखला सापडेल त्या प्राप्तीच्या सरासरीच्या किंमती इतकी असेल.

**नियम ३.**--ज्या जमिनीबद्दल निकटपूर्वीच्या कलमा अन्वये जुडी, सलामी, उक्ता धारा किंवा इतर कोणत्याही प्रकारचा भूमि-कर प्रांतिक [१][२][राज्य] शासनास पूर्वीच देण्यात आला असेल]] किंवा [१][२][राज्य] शासनास द्यावयाचा असेल]] अशा जमिनी फक्त एक-अष्टमांस आकारणीस पात्र ठरण्याऐवजी त्या, त्यावरील अशी जुडी, सलामी किंवा उक्ता धारा किंवा उपरिनिर्दिष्ट इतर कर देण्याव्यतिरिक्त उक्त जुडी, सलामी किंवा इतर उक्ता धारा किंवा उपरिनिर्दिष्ट इतर कर ह्याची वार्षिक किंवा सरासरी रक्कम ही आकारणीच्या रकमेहून जितकी कमी पडेल तितक्या रकमेचा एक-अष्टमांश इतका आणखी वार्षिक उक्ता धारा देण्यात पात्र ठरतील.

**नियम ४.**--सध्या अंमलात असलेल्या महसूल मोजणी अन्वये ज्या जमिनीवर पूर्वीच आकारणी करण्यात आली नसेल अशा जमिनींच्या बाबतीत ह्या कलमान्वये (कलम ६) बसविलेला उक्ता धारा हा कायमचा म्हणून निश्चित केला पाहिजे. आणि तो कोणतीही नवीन कर-आकारणी करण्यात आल्यामुळे वाढविता येणार नाही किंवा कमी करता येणार नाही ; परंतु ह्या कलमाचे (कलम ६) नियम १ यातील तद्विरुध्द तरतूद ही, ज्या मर्यादेपर्यंत केली असेल तेथवर त्यांत वाढ करता येईल किंवा तो कमी करता येईल.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**नियम ५.**—प्रत्येक धारकाच्या कब्जात असलेल्या सर्व जमिनी, जरी त्या मूळ दुमालापेक्षा अधिक असल्या तरीही, कलम ७ मधील मजकुरास अधीन राहून, ह्या कलमाच्या (कलम ६) उपबंधानुसार आणि त्यास जोडलेल्या नियमांनुसार चालू रहातील.

कलम ६ अन्वये वार्षिक उक्ता धारा बसविण्याबाबत केलेली तडजोड, हक्कदार मालकावर आणि तसेच भूमिधारकावर बंधकारक असणे.

**७.** कलम ६ [1][***] आणि उक्त कलमास जोडलेले नियम यानुसार जमीन महसुलाच्या रकमेबाबत संपूर्णतः किंवा अंशतः माफी मिळालेल्या जमिनींच्या धारकाबरोबर [2][[3][राज्य] सरकारने] केलेली कोणतीही तडजोड, [2][[3]राज्य] सरकारचा] उक्त कलमांत निर्दिष्ट केलेला वार्षिक उक्ता धारा बसविण्याचा अधिकार शक्य तेथवर विचारात घेऊन, धारक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांच्यावरच केवळ बंधनकारक असणार नाही तर अशा जमिनीचे हक्कदार मालक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांच्यावरही बंधनकारक असेल ; मग असा हक्कदार मालक कोणीही असो :

हक्कदार मालक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांच्या, धारक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांच्या विरुध्दच्या हक्कांचे आणि उपाययोजनांचे सरंक्षण.

परंतु, हा अधिनियम संमत झाला नसता तर, हक्कदार मालक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांना उक्त जमिनी किंवा त्यांचा कोणताही भाग उक्त धारक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांच्याकडून परत घेण्यासंबंधीचे कोणतेही हक्क किंवा उपाययोजनायांस [4][***] ह्या अधिनियमाअन्वये किंवा त्यातील कोणत्याही मजकुरामुळे हानी पोहोचते असे समजता कामा नये. आणि जर हक्कदार मालक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांना उक्त जमिनी किंवा त्यांचा कोणताही भाग उक्त धारक, त्याचे वारस आणि अभिहस्तांकिती यांच्याकडून परत मिळेल तर, [2][[3]राज्य] सरकारने] उक्त जमीन धारकाच्या कब्जात असताना [1][***] कलमे २ आणि ६ आणि उक्त कलम ६ यास जोडलेले नियम यानुसार कोणताही जाहीरनामा, हमी किंवा तडजोड केली असेल तर या सर्व गोष्टी उक्त हक्कदार मालक, त्यांचे वारस आणि अभिहस्तांकिती यांना फायदेशीररीत्या लागू होतील.

मालकी हक्क सिध्द झाला असता धारकास उक्ता धाऱ्याची माफी मिळून त्याच्या मालकी हक्कासंबंधी आणखी चौकशी होऊ नये.

**८.** कलम ६ मध्ये सांगितलेला उक्ता धारा देण्यास तुमची संमती आहे किंवा नाही असे दुमाला जमिनीच्या धारकांस ह्यानंतर अंमलात येणाऱ्या नियमा अन्वये विचारले असता तो आपल्या मालकी हक्काबाबत पूर्वीच यथानियम निवाडा झाला आहे असे उत्तर देईल तर आणि अशा निवाड्याचा पुरावा देईल तर आणि ते प्रकरण कलम २, कंडिका २ च्या प्रकरणात येत नसेल तर, उक्त धारक उक्त धाऱ्यासंबंधीच्या जबाबदारीतून आणि मालकी हक्कासंबंधीच्या नंतरच्या कोणत्याही चौकशीतून मुक्त होईल.

परंतुक.

परंतु, पूर्वीच्या निवाड्याची मर्यादा विस्तृत करण्याच्या प्रयोजनाकरिता किंवा इतर कारणाकरिता उक्त धारक, [1][***] कलम दोन आणि पुढील कलमे यात सांगितलेल्याप्रमाणे आपल्या जमिनीबाबत तडजोड व्हावी असा अर्ज करील तर त्यास तसे करता येईल; आणि नंतर उक्त निवाड्याअन्वये विशेष हक्क प्रदान केलेल्या जमिनी, सर्व शर्तीस अधीन राहून, जणू काही अशा जमिनीबाबत पूर्वी निवाडा झालाच नाही असे समजून धारण करता येतील.

---

[1] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची **मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १)** यांचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

[2] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] निरसन अधिनियम १८७६ (१८७६ चा १२) द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

**९.** खंड १ ला.--जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी मिळालेल्या जमिनीचा धारक [१][***] कलमे ६ आणि ७ मध्ये सांगितलेली तडजोड करून घेण्यास कबूल आहे की नाही हे माहीत करून घेण्यासाठी त्यास लेखी नोटीस देऊन किंवा देण्याची व्यवस्था करून तुम्हास उपरिनिर्दिष्ट तडजोड मान्य आहे की आपल्या मालकी हक्कासंबंधी चौकशी मागता हे कळविण्यास सांगण्याचा अधिकार प्रत्येक [२][***] जिल्ह्याच्या कलेक्टरास किंवा त्याने योग्यरीत्या अधिकार दिलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास आहे. अशी तडजोड करून घेण्यास तुम्ही तयार आहात की आपल्या मालकी हक्काबाबत चौकशीची मागणी करता हे कळविण्या-बद्दल धारकास नोटीस देण्याचा कलेक्टरास अधिकार असणे.

खंड २ रा.--ज्या जिल्ह्यात जमीन असेल त्या [२][***] जिल्ह्याच्या प्रचलित भाषेत नोटीस असावी आणि तीत [३][[४][राज्य] सरकारकडून] देण्यात आलेल्या पर्यायांचे स्वरूप यासंबंधी स्पष्टीकरण केले पाहिजे. नोटिशीची भाषा व नमुना.

खंड ३ रा.--जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी असलेल्या जमिनीचा धारक, किंवा धारक म्हणून सरकारी जमीन-नोंदणी पुस्तकात ज्याची नोंद असेल तो धारक [५][जिल्ह्याच्या] हद्दीत राहत असेल तर, त्याच्यावर नोटीस बजावण्यात आली पाहिजे. नोटीस कोणावर बजावण्यांत येईल.

खंड ४ था.--उपरिनिर्दिष्ट असे इसम [५][जिल्ह्याच्या] हद्दीत राहत नसतील तेव्हा, उपरिनिर्दिष्ट इसमांच्या वतीने अशा जमिनीबाबत व्यवस्था पाहणाऱ्या कोणत्याही इसमावर बजावण्यात आली पाहिजे. धारक जिल्ह्याच्या हद्दीत राहत नसेल तेव्हां.

खंड ५ वा.--जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी असलेल्या जमिनी एकाहून अधिक इसम संयुक्तरीत्या धारण करीत असतील तेव्हा, त्यांच्यापैकी कोणत्याहि एका इसमावर नोटीस बजाविणे हे असे असेल. अनेक इसम संयुक्तपणे जमीन धारण करीत असतील तेव्हां नोटीस ज्या रीतीने बजावण्यात येईल ती रीत.

खंड ६ वा.--ज्या [५][जिल्ह्यात] जमिनी आहेत त्या [५][जिल्ह्यात] धारकाच्या वतीने व्यवस्था पाहणारा कोणताही इसम नसेल आणि धारक, मुंबई इलाख्यातील दुसऱ्या [५][जिल्ह्यात] राहतो असे समजेल तर अशा दुसऱ्या [५][जिल्ह्याच्या] कलेक्टरकडे अशी नोटीस पाठविण्यात आली पाहिजे. आणि त्याने ती धारकावर बजावली पाहिजे किंवा बजाविण्याची व्यवस्था केली पाहिजे. धारक दुसऱ्या जिल्ह्यांत राहतो असे माहीत असेल तेव्हा नोटीस ज्या रीतीने बजावण्यात येईल ती रीत.

---

[१] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे वरील मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.
[२] सन १८८६ चा मुंबई ३, अनुसूची ब द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.
[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[५] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*धारकाच्या वतीने व्यवस्था पाहणारा कोणी नसेल आणि धारक सापडत नसेल तर, नोटीस बजाविण्याची रीत.*

खंड ७ वा.--धारकाच्या वतीने काम पाहणारा कोणीही नसेल आणि धारक सापडत नसेल तर, प्रत्यक्ष खातेदार म्हणून जे कोणी इसम असतील त्यापैकी एकावर नोटीस बजावण्यात आली पाहिजे. आणि त्या नोटीशीची नक्कल [१][जिल्ह्याच्या] मुख्य महसूल अधिकाऱ्याच्या कचेरीत आणि ज्या गावात अशा जमिनी असतील त्या गावातील चावडीत किंवा रहदारीच्या सार्वजनिक जागी लावण्यात आली पाहिजे.

*धारक नोटीशीचे उत्तर सहा महिनेपर्यंत न देईल तर त्यास अशा चौकशीची आवश्यकता नाही असे समजणे.*

खंड ८ वा.--अशी नोटीस उपरिनिर्दिष्ट रीतीने बजाविण्यात आल्यानंतर सहा [२][***]महिन्याच्या आत, जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी असलेल्या जमिनीचा धारक किंवा त्याचा वैध रीत्या नेमलेला अभिकर्ता नोटिशीचे लेखी उत्तर देऊन त्यामध्ये, आपणास तडजोड अमान्य आहे आणि आपल्या मालकी हक्कासंबंधी चौकशी व्हावी अशी स्पष्ट मागणी न करील तर, त्यास चौकशीची आवश्यकता नाही असे समजण्यात आले पाहिजे. आणि त्या जमिनीसंबंधी [३][***] कलमें २ आणि ६ आणि उक्त कलम सहास जोडलेले नियम या अन्वये व्यवस्था केली पाहिजे.

*धारक किंवा मालक यांचा पत्ता न लागल्यास जमिनीवर पूर्ण आकारणी बसवावी.*

जर जमिनीचा धारक किंवा मालक यांचा पत्ता लागणे अशक्य असेल तर, त्या जमिनीवर पूर्ण आकारणी बसवावी आणि, मुदतीबाबत अधिनियमात सांगितलेल्या मुदतीच्या आत, कोणी इसम हजर होऊन त्या जमिनीवर आपला मालकी हक्क सिध्द करीपर्यंत अशी आकारणी चालू राहील.

*नोटीस पुरेशा मुदतीत बजाविण्यात आली नाही किंवा तिचे उत्तर पुरेसे नाही म्हणून घेतलेल्या हरकतीची चौकशी.*

खंड ९ वा.--ह्या कलमा अन्वये बजाविण्यात आलेली कोणतीही नोटीस किंवा कोणत्याही नोटिसा किंवा उपरिनिर्दिष्ट असे कोणतेही उत्तर किंवा त्याचा अर्थ किंवा ते ह्या अधिनियमात निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत दिले याबाबतीत कोणतीही हरकत घेतली गेल्यास त्याबाबतीत कलम १२ अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्याकडून चौकशी करण्यात आली पाहिजे अशा उपरिनिर्दिष्ट अधिकाऱ्याचा निर्णय हा अखेरचा असेल आणि त्यावर कोणत्याही दिवाणी न्यायालयात [४][***] किंवा इतरत्र अपील करता येणार नाही किंवा हरकत घेता येणार नाही.

परंतु, या कलमा अन्वये चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याने नोटीस बजाविली असेल त्या प्रत्येक बाबतीत ती नोटीस पुरेशा मुदतीत बजाविल्याबाबतच्या त्याच्या निर्णयावर ३० दिवसांच्या आत [२][***] कमिशनरकडे [२][***] अपील करता येईल आणि त्याचा निर्णय अखेरचा असेल.

*मागणी केलेली चौकशी कशी करावी.*

**१०.** खंड १ ला.--उपरिनिर्दिष्ट प्रमाणे धारकावर नोटीस बजाविल्यावर त्याने अशा चौकशीची मागणी केल्यास, ती नियमान्वये आणि पुढील तत्त्वांनुसार करण्यात आली पाहिजे.

---

[१] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाद्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाद्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

[४] निरसन अधिनियम १८७६ (१८७६ चा १२) द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

खंड २ रा.--माफी मिळण्यासाठीचा मालकी हक्क जितक्या जमिनीविषयी सिध्द झाला असेल त्यापेक्षा अधिक जमीन धारण केलेली आहे असे निश्चित होईल तेव्हा, त्या जास्त जमिनीवर पूर्ण आकारणी बसविण्यास मालकी हक्क सिध्द झाल्यामुळे प्रतिबंध होणार नाही आणि त्या जमिनीवर ताबडतोब पूर्ण आकारणी केली पाहिजे.

मालकी हक्क जितक्या जमिनीबद्दल सिध्द झाला असेल त्यापेक्षा अधिक धारण केलेल्या जमिनीवर पूर्ण आकारणी बसवावी.

खंड ३ रा.--उपरिनिर्दिष्ट अशी चौकशी झाल्यावर, जमीन महसुलाची माफी मिळण्यासाठी मालकी हक्क जमीन धारण करणारास सिध्द करता न आला तर, ज्या जमिनीबाबत असा मालकी हक्क त्याला सिध्द करता आला नाही त्या जमिनी, त्यापुढे वार्षिक महसुलाच्या पूर्ण आकारणीस पात्र ठरतील.

माफी सिध्द न झाल्यामुळे होणारा परिणाम.

**११.** खंड १ ला.--जमीन महसुलाची संपूर्णत: किंवा अंशत: माफी असलेल्या जमीनचे धारक [१][***] कलम १० च्या तरतुदी अन्वये त्याच्या मालकी हक्काचा इन्साफ होऊन त्यावर निवाडा व्हावा अशी मागणी करतील तेव्हा, [१][***] कलम ६ चे नियम १ आणि २ अनुसार त्या जमिनीची जी वार्षिक आकारणी निश्चित होईल तिच्या एक अष्टमांश भागाइतकी रक्कम, त्यांनी त्याच वेळी कलेक्टराच्या खजिन्यात किंवा ज्या तालुक्यात जमिनी असतील त्या तालुक्याच्या खजिन्यात अनामत ठेवली पाहिजे आणि त्यानंतर अशा चौकशीची मागणी केल्याच्या तारखेपासून असा निवाडा होईल त्या तारखेपर्यंत उक्त आकारणीचा एक अष्टमांश भाग दरवर्षी भरला पाहिजे आणि उरलेल्या सात अष्टमांश भागासाठी समाधानकारक तारणपत्र पुरविले पाहिजे, अशी रक्कम अनामत ठेवण्यात किंवा असे समाधानकारक तारणपत्र पुरविण्यात त्यानी कसूर केल्यास चौकशीचा विषय म्हणून अंतर्भूत असणारी जमिनीची संपूर्ण आकारणी ही, निवाडा करण्यात येईपर्यंत बसविण्यात आली पाहिजे.

न्यायचौकशीची आणि निवाड्याची मागणी करणाऱ्या धारकांनी तारणपत्र पुरविणे.

खंड २ रा.--जर चौकशी करण्यात आल्यामुळे त्याने मांडलेला मालकी हक्क सिध्द झाला तर, धारकास किंवा तो मरण पावल्यास उक्त जमिनी त्याच्या ज्या वारसांच्या कब्जात जाईल त्यास, उपरिनिर्दिष्ट चौकशी होईपर्यंत ह्या कलमाच्या उपबंधांन्वये जी कोणतीही आकारणी बसविली असेल त्याची रक्कम दरसाल दर शेकडा पाच या दराप्रमाणे व्याजासहित परत देण्यात आली पाहिजे.

धारकाने त्याचा मालकी हक्क सिध्द केल्यास आकारणीची रक्कम आणि अनामत रकमा व्याजासह त्यास परत मिळणे.

खंड ३ रा.--जर चौकशी करण्यात आल्यामुळे धारकास आपला मालकी हक्क सिध्द करता आला नाही तर, त्याने चौकशीची मागणी केल्याच्या तारखेपासून त्या जमिनीवर बसविता येईल ती महसुलाच्या आकारणीची पूर्ण रक्कम उक्त धारकाकडून किंवा त्यास जामीन राहिलेल्या इसमाकडून किंवा दोघांपैकी एकाकडून वसूल करण्यात आली पाहिजे अशा रकमेत, उपरिनिर्दिष्ट निवाडा होईपर्यंत अनामत ठेवलेल्या किंवा बसविलेल्या कोणत्याही रकमा जमा करण्यात येतील.

मालकी हक्क सिध्द न झाला तर धारकाने जमीन महसुलाची पूर्ण रक्कम द्यावी.

---

[१] मुंबईचा सर्वसाधारण वाक्यखंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

चौकशी कोणी करावी.

**१२.** [१][****] कलम १० मधील तरतुदी अन्वये चौकशी करण्याची मागणी केली असता, अशी चौकशी कलेक्टराकडून, [१][***] किंवा, [२][[३][राज्य] सरकारने] त्याबाबत विशेष अधिकार दिलेल्या कोणत्याही सहाय्यक किंवा प्रति कलेक्टर यांच्याकडून करण्यात आली पाहिजे.

चौकशीची मागणी करणाऱ्या दावेदाराने करावयाच्या गोष्टी.

**१३.** कोणत्याही दावेदाराने उपरिनिर्दिष्ट चौकशीची मागणी केल्यावर त्याने, आपला हेतू अधिसूचित केल्यापासून दोन महिन्यांच्या आत, अशा प्रकरणी [४][****] कलम ११ अन्वये आवश्यक असलेली अनामत रक्कम आणि तारणपत्र पुरविले पाहिजे, आणि माफीचा दावा ज्या मुद्यांवर आधारित असेल ते मुद्दे सविस्तरपणे लिहून आणि अशा दाव्याच्या पुष्ट्यर्थ तो जे मूळ लेख (कोणतेही असल्यास), सादर करू इच्छितो त्यांच्या नकला आणि मी जो पुरावा तो लेखी किंवा तोंडी देऊ इच्छितो त्याची यादी त्याने कलेक्टराच्या कचेरीत पाठविली पाहिजे ; आणि उक्त विवरणपत्रकांत किंवा त्या सोबतच्या कागदपत्रांत स्पष्टपणे नामनिर्देश केलेल्या अशा लेखांखेरीज आणि साक्षीदारांखेरीज, अशा दाव्याच्या पुष्ट्यर्थ इतर अधिक पुरावा, इन्साफ करणाऱ्या अधिकाऱ्याची खात्री होण्यासारखे कारण दाखविल्यावाचून, दाखल करता येणार नाही.

खंड १ नुसार आवश्यक असलेल्या गोष्टींचे पालन करण्यात कसूर केल्यास दावा नामंजूर करणे.

खंड २ रा.—कोणत्याही दावेदार ह्या कलमाची खंड १ अनुसार आवश्यक त्या गोष्टीचे निर्दिष्ट केलेल्या मुदतीत, पालन करण्यास चुकेल आणि अपरिहार्य कारणास्तव तशी चूक झाली असे त्या जिल्ह्याच्या कलेक्टराची संमाधानरित्या खात्री करून न देईल तर, त्याचा दावा कायमचा नामंजूर करण्यात आला पाहिजे आणि त्याच्या जमिनीवर ताबडतोब पूर्ण आकारणी केली पाहिजे.

कलेक्टरने चौकशीचे कागदपत्र स्वतः दाखल करावे किंवा इतर अधिकाऱ्याकडे पाठवावे, चौकशीची तारीख निश्चित करावी.

खंड ३ रा.—उक्त लेख आणि त्यासोबतचे कागदपत्र मिळाल्यावर, कलेक्टरने ते, त्याजपुढे इन्साफ करण्यात येत असलेल्या कामासाठी दाखल केले पाहिजेत किंवा निकटपूर्वीच्या कलमान्वये अशी चौकशी करण्यासाठी योग्य रीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे इन्साफासाठी पाठविले पाहिजेत ; इन्साफ करणाऱ्या अधिकाऱ्याने, जनतेच्या सोईकडे व त्यात हितसंबंध असलेल्या इसमाच्या सोईकडे वाजवी लक्ष देऊन इन्साफाचे कामकाज ज्यावेळी करण्यात येईल ती वेळ निश्चित केली पाहिजे.

ज्या तारखेस न्यायचौकशी करण्यात येईल त्या तारखेची नोटीस दावेदारास देणे.

निश्चित करण्यात आलेल्या तारखेसंबंधीची नोटीस दावेदारास देण्यात आली पाहिजे, आणि सुनावणीसाठी नेमलेल्या दिवशी दावेदाराने स्वतः जातीने किंवा योग्यरित्या नेमलेल्या अभिकर्त्यामार्फत, सर्व मूळ लेख घेऊन, हजर राहले पाहिजे.

---

[१] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे हा मजकुरा निरसित करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची 'ब' द्वारे हा मजकुरा निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) चा परिशिष्ट म्हणून छापले आहे.

**१४.** कोणताही दावेदार उपरिनिर्दिष्ट चौकशीची मागणी करील तेव्हा, मालकी हक्क सिद्ध करण्याचा बोजा प्रत्येक वेळी, संपूर्णत: त्याच्यावरच राहील आणि कोणत्याही दिवाणी न्यायालयाने, [१][****] ज्या जमिनीबाबत उपरिनिर्दिष्ट अशी कोणतीही चौकशी चालू असेल त्या जमिनीवर सामान्य जमीन महसुलाची आकारणी बसविण्याचा [२][[३][सरकारचा]] अधिकार सिद्ध करण्याचा बोजा [२][[३][सरकारवर]] किंवा [२][[३][सरकारचे]] प्रतिनिधित्व करणाऱ्या अधिकाऱ्यावर किंवा अधिकाऱ्यांवर टाकणे हे विधिसंमत असणार नाही :

चौकशीची मागणी करणाऱ्या दावेदारावर मालकी हक्क सिद्ध करण्याचा बोजा.

आणि उपरिनिर्दिष्ट अशी कोणतीही चौकशी ही ज्या जमिनीबाबत करण्यात येत असेल त्या जमिनीवर असा सामान्य जमीन-महसूल बसविण्याचा [२][[३][सरकारचा]] अधिकार, तद्विरुध्द स्पष्टपणे सिद्ध करण्यात येईपर्यंत चालू आहे असे प्रत्येक बाबतीत गृहीत धरण्यात आले पाहिजे.

तसेच, या अन्वये आणखी अशी तरतूद करण्यात येते की, ह्या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, माफीसंबंधीचा उपरिनिर्दिष्ट मालकी हक्क खोडून काढण्यासाठी किंवा त्याचे निराकरण करण्यासाठी पुरावा देण्याची किंवा सादर करण्याची जर [२][[३][सरकारास]] किंवा योग्य रीत्या अधिकार दिलेल्या त्याच्या अधिकाऱ्यास आवश्यकता किंवा इष्टता वाटेल तर, त्यांनी असा पुरावा देण्याच्या किंवा सादर करण्याच्या त्यांच्या अधिकारास बाध येणार नाही.

**१५.** हल्लीच्या किंवा कोणत्याही मागील सरकारचे दफ्तर स्वाधीन ठेवण्याचा किंवा आपल्या अभिरक्षेत ठेवण्याचा अधिकार [२][[३][राज्य] सरकारने] ज्या सरकारी अधिकाऱ्यास दिला असेल त्या सरकारी अधिकाऱ्याच्या स्वाधीन असणाऱ्या किंवा अभिरक्षेत असणाऱ्या दफ्तरात जो कोणताही पुरावा सापडेल तो पुरावा, आपल्या मालकी हक्कासंबंधी मागणी करणाऱ्या कोणत्याही दावेदारास उपलब्ध करून दिला पाहिजे, आणि तो शोधून काढण्याबद्दल किंवा सादर करण्याबद्दल त्याच्याकडे अर्ज आला असता अशा सरकारी अधिकाऱ्याने तो शोधून हजर केला पाहिजे.

सरकारी अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असलेल्या सरकारी दफ्तरातील पुरावा घेण्याचा दावेदारास अधिकार असणे.

**१६.** मुंबई अधिनियम संग्रहातील सन १७२७ चा विनियम १७ चे कलम ४२[४] हे ज्या तारखेस अंमलात आले त्या तारखेपासून म्हणजे त्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेपासून एक वर्ष संपण्यापूर्वी कलेक्टरने नोंदणी केली असा शेरा ज्या सनदेवर नसेल ती कोणतीही सनद, माफीसंबंधी केलेल्या दाव्यात त्याच्या पुष्ट्यर्थचा पुरावा म्हणून दाखल करून घेणे हे न्यायचौकशी करणाऱ्या प्राधिकाऱ्यावर बंधनकारक असणार नाही.

विवक्षित सनदा पुराव्यात दाखल करण्यास न्यायचौकशी अधिकाऱ्यावर बंधन नसणे.

**१७.** खंड १ ला.—अशा चौकशीच्या दाव्यात, दावेदाराच्या वतीने किंवा [३][सरकारच्या] वतीने बोलविलेल्या साक्षीदारावर समन्स बजविण्याबाबत व त्यांनी हजर राहून जबानी देण्याबाबत, ह्या अधिनियमात निर्दिष्ट केले असले ते खेरीजकरून, [५]दिवाणी प्रक्रिया संहितेचे नियम अनुसरले पाहिजेत ;

साक्षीदारावर समन्स बजाविणे, त्यांनी हजर रहाणे आणि त्यांची तपासणी करणे याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता लागू असणे.

---

[१] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.
[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[३] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[४] या अधिनियमाच्या कलम १ द्वारे सन १८२७ मुंबई विनियम १७ याचे कलम ४२ निरसित करण्यात आले.
[५] आता दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (१९०८ चा ५) पहावे.

कलेक्टरची कचेरी दिवाणी न्यायालय समजणे.

आणि ह्या चौकशीच्या कारणाकरिता, कलेक्टरच्या किंवा इतर न्यायचौकशी अधिकाऱ्याच्या कचेरीची, उक्त संहिते अन्वये अपेक्षिल्याप्रमाणे, दिवाणी न्यायालय म्हणून रचना केली पाहिजे.

कामकाजाच्या दफ्तराची भाषा.

**१८.** कलेक्टराने किंवा इतर न्यायचौकशी अधिकाऱ्याने त्याच्या कामकाजाचे दफ्तर, जिल्ह्यांत सर्वसाधारणपणे जी भाषा बोलली जात असेल त्या भाषेत ठेवावे.

निर्णयाचे भाषांतर दावेदारास देणे.

तसेच, त्याने निर्णयाच्या मुद्यासंबंधी विवरण करून आपला निर्णय इंग्रजी भाषेत नोंदावा ; आणि अशा निर्णयाचे आणि विवरणाचे भाषांतर, अशी चौकशी झाल्यानंतर, दावेदारास किंवा त्याच्या वतीने हजर असणाऱ्या पक्षकारास द्यावे.

न्यायालय शुल्क अधिनियम लागू असणे.

खंड २ रा.—उपरिनिर्दिष्ट भाषांतर आणि कलम १३, खंड १ मध्ये वर्णिलेले विवरणपत्रक आणि त्यासोबतचे कागदपत्र खेरीज करून, इतर सर्व विनंती-पत्रके किंवा दावेदाराने किंवा त्याच्या वतीने सादर केलेले कागदपत्र याना, [१][न्यायालय शुल्क अधिनियम, १८७०][२] च्या तरतूदी लागू आहेत असे समजले पाहिजे, आणि सर्व मुद्रांकास लागणारा खर्च उक्त दावेदाराने संपूर्णतः सोसला पाहिजे.

माफी चालू रहाण्याबद्दल झालेला निर्णय अखेरचा असणे.

**१९.** खंड १ ला.—कलेक्टरने किंवा इतर न्यायचौकशी अधिकाऱ्याने माफी किंवा तिचा कोणताही भाग चालू रहावा असा निर्णय दिल्यास अशी माफी त्या निर्णयानुसार देण्यात येईल आणि असा निर्णय अखेरचा असेल.

प्रतिकूल निर्णय झाल्यास दावेदाराने अपील करणे.

खंड २ रा.—संपूर्णतः किंवा अंशतः माफी मिळावी म्हणून केलेल्या दाव्याचा निर्णय दावेदाराच्या हक्काविरूध्द झाल्यास, त्या निर्णयाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंत, जिल्हा न्यायालयाकडे अपील करण्याची दावेदारास मोकळीक असेल, परंतु असे अपील, माफीची वार्षिक किंमत पन्नास रुपये किंवा त्याहून जास्त असेल तरच चालेल आणि कलम १०, खंड ३ अन्वयेचे कामकाज, अशा अपिलाचा निकाल होईपर्यंत, कोणत्याही परिस्थितीत, स्थगित करता येणार नाही.

अपील यशस्वी झाल्यास रक्कम परत मिळणे.

खंड ३ रा.—अपिलाचा निर्णय दाव्याच्या बाजूने झाला तर, कलम १०, खंड ३ अन्वये बसविलेली रक्कम परत देण्यात येईल.

दावेदार, प्रारंभिक न्यायचोकशीत सादर न केलेला नवीन पुरावा अपिलात सादर करील तर त्याची अनामत सरकार जमा होईल.

खंड ४ था.—कलेक्टरापुढे किंवा न्यायचौकशी अधिकाऱ्यापुढे सादर न केलेला कोणताही तोंडी किंवा लेखी पुरावा, दावेदाराने असा पुरावा पूर्वीच सादर का केला नाही याविषयी पुरेसे कारण न दाखविता आणि असे कारण कलेक्टराकडे सादर केले होते असे सिद्ध न करता किंवा अशा रीतीने का सादर करण्यात आले नाही याविषयी सबळ कारण न दाखविता अपिलात दाखल करण्यात आला तर कलम १० अन्वये उक्त दावेदाराकडून घेतलेल्या सर्व रकमा, अपील यशस्वी झाले तरीही, जप्त करण्यात येतील.

---

[१] सुधारणा अधिनियम, १८९५ (१८९५ चा १६) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] केंद्रीय अधिनियम.

खंड ५ वा.—अपिलातील सर्व कामकाज, [1][न्यायालय-शुल्क अधिनियम, १८७०][2] च्या तरतूदी लागू असतील.

न्यायालय-शुल्क अधिनियम लागू असणे.

खंड ६ वा.—कलेक्टराचा किंवा न्यायचौकशी अधिकाऱ्याचा निर्णय, अपील केल्यामुळे, नमुन्याप्रमाणे नसल्यामुळे किंवा तांत्रिक मुद्यामुळे रद्द होणार नाही.

कलेक्टरचा निर्णय रद्द करण्यास प्रतिबंध.

**२०.** खंड १ ला.—हल्लीच्या किंवा पूर्वीच्या कोणत्याही सरकारने दिलेल्या सनदे अन्वये किंवा लेखा अन्वये किंवा, सनद किंवा लेख देण्याचा अधिकार त्यांच्या ज्या अधिकाऱ्याना असेल त्यापैकी कोणीही दिलेल्या सनदे अन्वये किंवा लेखा अन्वये माफीविषयी दावा करण्यात येईल तेव्हा, त्या अनुदानाच्या अटींनुसार माफी मंजूर करावी. परंतु, अशा अनुदानाच्या अटी अंमलात आल्या नाहीत किंवा त्या अटी सक्षम अधिकाऱ्याने सुधारल्या किंवा रद्द केल्या असा पुरावा पुढे आला तर, त्या अटींनुसार माफी मंजूर करू नये.

सनदे अन्वये माफीविषयी दावा केला असेल तेव्हा, सनदेतील अटींनुसार माफी मंजूर करावी.

खंड २ रा.—[3]*अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक अधिकाऱ्यांचा पूर्वीच्या सरकारांनी दिलेला जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी देण्याबाबतचा सनदा देण्याचा किंवा त्या रद्द करण्याचा अधिकार मान्य केला आहे.

सनदा देण्याच्या किंवा त्या रद्द करण्याच्या अधिकाराची ज्यांना मान्यता दिली आहे ते अधिकारी.

**२१.** पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्याच्या मालकी हक्काच्या जमीन महसुलाची माफी मिळावी म्हणून केलेले दावे पुढील परिस्थितीनुसार दाखल केले जातील.

पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्याच्या मालकी हक्काच्या आधारे केलेला माफीसंबंधीचा दावा मान्य करणे.

खंड १ ला.—सन १८०३ नंतर पेशव्यांनी दिलेल्या किंवा त्यांच्याकडून जिंकून घेतलेल्या जिल्ह्यातील जमीन ह्या अधिनियमाच्या तारखेच्या पूर्ववर्ती तारखेपर्यंत सतत साठ वर्षे जमीन महसुलाच्या संपूर्णतः किंवा अंशतः माफीने कोणत्याही इसमाने, त्याच्या वारसांनी किंवा त्याच्यापासून हक्क मिळालेल्या इतर इसमाने, देशाच्या चाली रीतीने मान्यता दिलेल्या सत्ताप्रकाराने धारण केली आहे असे सिद्ध होईल तेव्हा; किंवा इतर कोणत्याही जिल्ह्यातील जमीन अशाच रीतीने उपरिनिर्दिष्ट प्रमाणे तीस वर्षे धारण केली आहे असे सिद्ध होईल तेव्हा.

खंड २ रा.—परंतु, सनदे अन्वये किंवा इतर लेखा अन्वये माफी मिळालेली असेल तर, उपरिनिर्दिष्ट सनदे अन्वये किंवा लेखा अन्वये प्राप्त झालेल्या मालकी हक्काची मुदत संपल्यानंतर, मागील पूर्ववर्ती खंडा अन्वये आवश्यक असलेली मुदत, पूर्ण भरल्याशिवाय, पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्याचा मालकी हक्काबाबत केलेला दावा दाखल करू नये.

खंड ३ रा.—देशाचा ताबा इंग्रज सरकारकडे आल्यानंतर ज्या सरकारी जमिनी सरकारच्या परवानगीवाचून दुमाला झाल्या असतील त्यांच्याबाबत पूर्वापास चालत आलेल्या भोगवट्याच्या आधारे केलेला मालकी हक्कासंबंधीचा दावा दाखल करू नये.

---

[1] सुधारणा अधिनियम, १८९५ (१८९५ चा १६) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] केंद्रीय अधिनियम.

[3] *मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा ३) अनुसूची ब द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आले आहे.

खंड ४ था.—आणि तसेच, ह्या कलमाच्या खंड १ मध्ये तपशिलवार सांगितलेल्या साठ व तीस वर्षाच्या मुदतीत माफीचा दावा ज्या मान्यता दिलेल्या सत्ताप्रकारा अन्वये केलेला असेल त्या सत्ताप्रकाराच्या शर्तीनुसार ती माफी चालत आली आहे, असे सिद्ध केले पाहिजे.

पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्याच्या आधारावर मान्य केलेला मालकी हक्क कोणत्या शर्तीनुसार मान्य करण्याचे चालू राहील.

**२२.** पूर्ववर्ती कलमा अन्वये, पत्रावर जो मालकी हक्क मान्य केला असेल तो मालकी हक्क त्यास ज्या सत्ताप्रकाराच्या शर्ती अन्वये माफी मिळाली असेल त्याच सत्ता प्रकारच्या शर्तीनुसार पुढे चालू रहाण्यांचे मान्य करण्यात येईल.

पूर्वापार भोगवट्यावर आधारित असलेला मालकी हक्क केंव्हा मान्य करू नये.

**२३.** कलम २१ अन्वये पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्यावर आधारित असलेला मालकी हक्क, जी कोणतीही जमीन चाकरीबद्दल किंवा चाकरी करण्याचे बंधन असलेल्या सत्ताप्रकाराने धारण केली असेल, मग अशी चाकरी करण्यात येत असो किंवा नसो, त्या जमिनीबाबत मान्य करू नये.

हल्लीचे किंवा पूर्वीचे सरकार वगैरेंनी काढलेल्या आदेशा अन्वये माफी रद्द झाली तर, पूर्वापार भोगवट्याचा सनद, वगैरे अन्वये मिळालेला मालकी हक्क, पुरेसा मालकी हक्क नसणे.

**२४.** खंड १ ला.—कलम २१ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे मान्यताप्राप्त सत्ताप्रकारांन्वये पूर्वापार भोगवट्यांची कलम २० अन्वयेची सनद किंवा इतर लेख हा, उक्त माफी विद्यामान किंवा पूर्वीच्या सरकारने किंवा पूर्वीच्या सरकारखाली जमिनींना सरकारी महसुलाची माफी देऊन त्याबाबत सनदा देण्याचा पूर्ण व योग्य प्राधिकार ज्या अधिकाऱ्याकडे होता अशा कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने काढलेल्या आदेशावरून माफी सर्वस्वी किंवा अंशतः रद्द करण्यात आली असेल किंवा उक्त कोणत्याही अधिकाऱ्याने काढलेल्या आदेशान्वये सदरहू जमिनीवर आकारणी करण्यात आली असून अशी आकारणी वसूल केली असेल व तो आदेश पुन्हा रद्द करण्यात आला नसेल तर त्या मर्यादेपर्यंत अशी सनद किंवा इतर लेख योग्य मालकी हक्काचा लेख आहे असे समजता कामा नये.

लेखा अन्वये किंवा मान्यता असलेल्या सत्ताप्रकारा-अन्वये भोगवटा झाला म्हणून मालकी हक्क केंव्हा पुरेसा नसणे.

खंड २ रा.—तशाच प्रकारे पूर्वापार चालत आलेल्या भोगवट्यात धारण केलेल्या आणि माफी नसलेल्या जमिनीप्रमाणेच असलेल्या जमिनीवर बारा वर्षेपर्यंत आकारणी बसविली होती आणि ती वसूल करण्यात आली असेल तर अशा विलेखा अन्वये, लेखा अन्वये किंवा मान्यता असलेल्या सत्ताप्रकारा अन्वये भोगवटा झाला असेल तरी तो पुरेसा मालकी हक्क म्हणून समजण्यात येणार नाही. परंतु उक्त मुदत संपण्यापूर्वी माफीच्या हक्काबाबत कोणताही दावा केला असल्यास त्याला बाध येणार नाही.

खंड ३ रा.—१२ वर्षेपर्यंत अशी आकारणी त्याच प्रकारच्या ज्या जमिनीस माफी नसेल त्या जमिनीच्या आकारणी इतकी नसेल तर जितकी आकारणी ठरवून वसूल केली असेल तितक्या आकारणीपुरती मालकी हक्कास हरकत घेण्यात येईल.

आकारणी ठरवून तिचा जितका भाग वसूल केला असेल तेवढ्याच भागाच्या मालकी हक्कास हरकत घेणे.

**२५.** हल्लीच्या किंवा पूर्वीच्या सरकारने किंवा अधिकार असलेल्या त्यांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी अमान्य केलेले दत्तक, जमीन परांपरागत वंशजाकडे चालेल म्हणून दिलेल्या अनुदाना अन्वये केलेल्या माफी विषयींच्या कोणत्याही दाव्याच्या प्रकरणी, मंजूर करू नयेत.

दत्तक केव्हां मंजूर करू नये.

**२६.** ज्या दाव्यांची चौकशी करणे असेल त्या सर्व दाव्यास, कलमें २० ते २५ चे उपबंध सामान्यतः लागू असतील आणि [१][***] कलम १० अन्वये चौकशीची मागणी केली तर, त्या चौकशीच्या प्रकरणी मात्र लागू नसतील.

कलमे २० ते २५ लागू असणे.

**२७.** [अनिर्णित कामकाज] सन १८७३ चा अधिनियम १२ अन्वये रद्द करण्यात आले.

**२८.** जमीन महसुलाची संपूर्ण किंवा कांही अशी माफी मिळावी म्हणून केलेल्या दाव्यांची तडजोड ह्या अधिनियमा अन्वये [२][[३][राज्य] सरकारने] किंवा [४][[५][सरकारच्या]] योग्य अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने केली असेल तेव्हा [६][***] [१][अशी कोणतीही तडजोड करण्यास नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजांवर, आदेशावर किंवा कारवाईवर किंवा असे कामकाज, आदेश किंवा कारवाई यांच्याविरूद्ध करावयाचें अपील, [२][राज्य]सरकारकडे] किंवा अशा अपिलांची दखल घेण्याकरिता [२][[३][राज्य] सरकारने] नेमलेल्या अशा अधिकाऱ्यांकडे किंवा अधिकाऱ्यांकडे करावे आणि इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याने अपिलांची दखल घेता कामा नये.

तडजोड करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामकाजावर अपील करणे.

**२९.** [सरकारी अधिकाऱ्यांविरूद्ध दावे करण्यास प्रतिबंध] सन १८७६ चा अधिनियम १० अन्वये रद्द करण्यात आले.

**३०.** ह्या अधिनियमा अन्वये द्यावयाच्या सर्व उक्त धारा, सामान्य जमीन-महसूल ज्यारितीने वसूल करण्यात येतो त्याचरितीने आकारण्यात यावा आणि असा उक्त धारा घेण्याच्या [२][[३][राज्य] सरकारच्या] अधिकारास अशा जमिनीविरूध्द किंवा धारकांविरूद्ध गहाणा अन्वये, निकालपत्रा अन्वये, हुकुमनाम्या अन्वये किंवा हुकुमनामा बजाविण्या अन्वये किंवा जप्ती अन्वये किंवा इतर कोणत्याही प्रकारे, कोणत्याही प्रकारचे कर्ज, मागणी किंवा दावा असेल तर अग्रमान्यता दिली पाहिजे.

उक्ता धारा कसा बसवावा.

---

[१] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३), अनुसूची ब द्वारे हा मजकूर निरसित केला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) यास परिशिष्ट म्हणून छापण्यात आले आहे.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६ (१८७६ चा १०) द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

जमिनी मोजण्यासाठी किंवा त्यावर आकारणी बसविण्या-करिता प्रवेश करणे.

**३१.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्याकरिता, कोणत्याही जमिनींची मोजणी करणे किंवा आकारणी बसविणे आवश्यक असेल तेव्हा, आकारणी बसविण्याच्या प्रयोजनाकरिता, कोणत्याही वेळी आणि वेळोवेळी त्या जमिनीवर जाण्याचा कलेक्टराला किंवा त्याने योग्य अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याला अधिकार आहे, आणि त्यानी तसे करणे वैध असेल.

अर्थ विवरणा-त्मक खंड

**३२.** (क) हा खंड सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३ अन्वये रद्द करण्यात आला.

(ख) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, "जमिनी" या शब्दात गावे, गावाचे भाग, त्याबाबतच्या महसुलाचा हिस्सा आणि जमिनीसंबंधीची प्रत्येक संपत्ती यांचा समावेश होतो असे समजावे.

(ग) "राजनैतिक सत्ताप्रकार" म्हणजे, राजनैतिक मोबदला म्हणून उत्पन्न केलेल्या किंवा त्याबद्दल दिलेल्या जमिनी असा समजावा, आणि अशा राजनैतिक मोबदल्याचे अस्तित्व [1][[2][राज्य] सरकार] ठरवील.

(घ) "चाकरीबद्दल धारण केलेल्या जमिनी" या संज्ञेत, चाकरीबद्दल खास दिलेल्या धारण केलेल्या किंवा चालू असलेल्या जमिनी, मग ती चाकरी चालू असो किंवा नसो, तसेच ज्या जमिनी काही अंशी मागील चाकरीबद्दल व काही अंशी पुढे चाकरी करण्याकरिता दिल्या आहेत किंवा चालविल्या आहेत किंवा धारण केल्या आहेत त्या सर्व जमिनींचा समावेश होतो; परंतु केवळ मागील चाकरीबद्दल दिलेल्या जमिनीचा त्यात समावेश होत नाही. ह्या अधिनियमाची अंमलबजावणी करतेवेळी कोणत्याही जमिनी या चाकरीबद्दल धारण केलेल्या आहेत की नाही याविषयी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, [1][[2][राज्य] सरकार] त्याचा निर्णय करण्यास सक्षम आहे असे समजले पाहिजे.

(ङ) "यथा नियम दिलेला निवाडा" या सज्ञेचा अर्थ, मुंबई सरकारचा कोणत्याही नियमान्वये दिलेला निवाडा; किंवा [1][[2][राज्य] सरकारने] अथवा त्याबाबत अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने केलेला निर्णय, असा समजावा.

(च) ह्या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, "धारक" या संज्ञेचा अर्थ, जमीन-महसुलाच्या आकारणीची संपूर्णतः किंवा अंशतः माफी मिळालेल्या जमिनीचा कब्जा स्वतः धारण करतो तो इसम, त्याची कुळे, पोट-कुळे किंवा अभिकर्ते, असा समजावा आणि त्यात, उपरिनिर्दिष्ट कब्जा गहाण मिळविणाऱ्या इसमाचाही समावेश होतो. कोणत्याहि मंदिराबाबतची समिति, व्यवस्थापक किंवा विश्वस्त यांच्यापैकी ज्यांच्याकडे अशा जमिनीचा कब्जा असेल ते त्या जमिनीचे धारक म्हणून समजण्यात येतील.

(छ) ह्या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, "हस्तांतरण" या शब्दाचा अर्थ, आभिहस्तांकरण करून, बक्षिस देऊन, विक्री करून, विलेख करून, इतर लेख करून किंवा इतर प्रकारे जमिनीची मालकी दुमाला करणे असा समजावा; आणि तसेच कब्जा दुसऱ्याच्या ताब्यात जाईल अशाप्रकारे केलेले गहाण खत याचाही त्यात समावेश होतो.

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात येईल.

[2] वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## अनुसूची

(कलम २०, खंड २ पहा)

पूर्वीच्या सरकार अन्वये जमिनीना सार्वजनिक महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी प्रदान करण्याबाबत सनदा देण्याचा अधिकार ज्यांना होता त्या अधिकाऱ्यांची यादी.

दिल्लीच्या बादशहाच्या अधिकाराखालील--

प्रांताचे सुभेदार.

पेशव्याच्या अधिकाराखालील प्रदेशातील--

पेशवा.

मुतालिकी शिक्का स्वाधीन असणारे सर्व अधिकारी--

त्या त्या जिल्ह्यातील सर्व सरसुभेदार.

सन १८०३ च्या पूर्वीचे विलेख असतील तर, कोणत्याही वरिष्ठ प्राधिकाऱ्याऐवजी पेशव्यांच्या अधिकाराखाली कामे करणारे सर्व स्थानिक वरिष्ठ अधिकारी.

महि नदीच्या उत्तरेकडील प्रदेश ज्या मुदतीत गायकवाडांकडे शेतीवाडीकरिता होता, त्या मुदतीत गायकवाड त्या प्रदेशाचे सरसुभेदार होते असे समजून ते, गायकवाड्यांच्या अधिकाराखालील प्रदेशातील--

खुद्द गायकवाड.

मुतालिकी शिक्का धारण करणारे सर्व अधिकारी.

शिंद्यांच्या अधिकाराखालील प्रदेशातील--

शिंदे.

मुतालिकी शिक्का धारण करणारे त्याचे अधिकारी.

होळकरांच्या अधिकाराखालील प्रदेशातील--

होळकर.

मुतालिकी शिक्का धारण करणारे त्याचे अधिकारी.

निजामाच्या अमलांखालील प्रदेशांतील--

निजाम.

त्यांच्या अमलांखालील जिल्ह्यातील--

सुरतेचा नबाब.

भडोचचा नबाब.

एच ७३-६०८२ पु.-१.२००७

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर